# अमरावती महानगरपालिका

परवानगी आदेश क्रमांक : 0223

प्रति, दिनांक : 28/11/2019

श्री / श्रीमती SAU. VIPUL URF SADHANA UTTAM JADHAO

AMT.

संदर्भ : इमारत परवाण्यास मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र .

प्रकार : आपला अर्ज क्रमांक : ००५२ दिनांक : २८/६/२०१९

महोदय,

उपरोक्त पत्राप्रमाणे आपला अर्ज

| | |
|---|---|
| भूखंड क्रमांक : 2 | सर्वे क्रमांक : 187/1,187/2 |
| मौजा. : RahatGaon | प्रभाग : |
| रस्ता : AMRAVATI | झोन : Head Office |

येथे इमारत बांधण्याकरीता मंजूरी मिळण्याचे संदर्भात खालील अटींवर मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१. समोरील, मागील व दोन्ही बाजूंनी प्रत्येकी अंमलबजावणी करीता सोडावयास लागणाऱ्या नियमाचे अंमलबजावणीकरीता म्हणून रिकामी झालेली जागा ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.
२. कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरीता / उपयोग अथवा राहण्याकरीता परवानगी घेतलेली / उपयोगी होण्याकरीता नसेल.
३. आरंभ प्रमाणपत्र/इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासून एक वर्षाकरीता वैध राहील.
४. जी जमिन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसित करण्यासाठी परवानगी अधिकार देणार नाही.
५. नकाशा मंजूर केल्याप्रमाणे / लाल रंगाने त्यात दुरस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास / भुखंडास लागून असणाऱ्या विद्यमान इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन प्रस्तावित घराचे / इमारतीचे बांधकाम असावयास पाहिजे.
६. न्हाणी व संडास, स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी, घाणपाणी व कचरा यांची तांत्रिकदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावावी.
७. अर्जदारास मंजुर नकाशा व्यतिरिक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास महानगरपालिकेची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक राहील.
८. मंजूरी करण्यात आलेल्या विकास कामाची / बांधकामाची सोबत पत्रकावरील माहिती सदहू भूखंडावर योग्य जागी सूचना फलक लावून त्यात लिहीण्यात यावी. त्याचप्रमाणे जाहिरातीच्या स्वरुपातही माहिती दोन वर्तमानपत्रात (एक मराठी) प्रसिध्द करण्यात यावी.
९. भूखंडात कमीत कमी दोन झाडे लावावीत.
१०. सेप्टीक संडास व्हॅटीलेशन पाईपची उंची स्वतःच्या व शेजारी घराच्या उंचीपेक्षा १० फुट उंच ठेवावी. व्हॅटीलेशन पाईपच्या तोंडावर डास प्रतिबंधक जाळी लावावी. सेप्टीक टॅंकद्वारे मैला, इतर सांडपणी स्वतःच्या खर्चाने पक्की नाली बांधून महानगरपालिकेच्या पक्कया नालीत मिळवावी.
११. बांधकाम परवानगी प्रमाणे प्लींथ / जी त्यांचे काम महानगरपालिका कडून तपासणी झाल्याशिवाय पुढील बांधकाम करु नये.
१२. विना परवानगी बांधकाम साहित्य, मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकू नये. तसे आढळल्यास आपणावर दंडात्मक जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.
१३. सदहू परवानगी ही तूर्त जोत्यापर्यंत धरण्यात यावी.
१४. ले-आऊट टाकल्यानंतर खोदकामापूर्वी महानगरपालिकेचे सक्षम अधिकाऱ्याकडून तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्याशिवाय खोदकाम सुरु करु नये. वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी मिळकत धारकाची राहील.
१५. भविष्यात म.न.पा. ला नाली करता जागा लागल्यास ती समास अंतरातून विनामूल्य द्यावी लागेल.
१६. मंजुर अभिन्यास / रेकार्ड प्रमाणे जागेची आखणी करुन घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची आहे. म.न.पा. ची काहीही जबाबदारी राहाणार नाही.
१७. कंपाऊंड वॉलचे बांधकाम करताना विभागणी नकाशावर दाखविलेल्या दुरुस्तीप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

१८. ना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वतः दोन महिण्याचे आत पाडुन टाकावे अन्यथा म.न.पा. कोणतीही नोटिस न देता पाडून टाकेलच. होणाऱ्या नुकासानीस अर्जदार स्वतः जबाबदार राहील व पाडण्याचा खर्च म.न.पा. वसूल करेल.

१९. पिण्याचे पाण्याची उपलब्धता वाढवीणेबाबतचे स्त्रोत बळकटी करण्याकरीता दिलेल्या योजनेप्रमाणे व्यवस्था करावी आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.

२०. विद्यमान रस्त्याची रुंदी ४.५ मी. पेक्षा कमी असल्यास रस्त्याचे मध्यापासून दोन्ही बाजुला २.२५ मी. अंतरापर्यंतची जागा ही रस्ता म्हणुनच सोडावी लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही.

२१. सौर उर्जेवर पाणी तापविण्याचा पद्धतीचा वापर करावा.

२२: घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मीती व सुक्या कचऱ्याचे पुर्नवर्गीकरण (3R) करणे बंधनकारक राहील

## सूचना

१. संदर्भधिन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणास प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासून एक वर्ष पावेतो वैध असतानाही मुदत दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक वर्षाचे नूतनीकरण करण्याकरीता विहीत नमुन्यात महानगरपालिकेत अर्ज करुन आवश्यक आहे.

२. आपण महानगरपालिकेत जमा केलेली अमानत रक्कम मंजूर नकाशात प्रारंभ प्रमाणपत्रातील अटीप्रमाणे बांधकाम करणार असल्याची पावती देणे अन्यथा, महानगरपालिकेचे पूर्व परवानगीशिवाय आपण बांधकामात केलेले फेरबदल इत्यादी आपली अमानत रक्कम महानगरपालिकेचे खाती वळती / जमा होईल.

३. महानगरपालिकेने मंजूर केलेल्या बांधकामातील पूर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल हे अवैध व अनधिकृत असतील त्यामुळे .....

अ) आपणावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे अंतर्गत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

ब) आपणांस महानगरपालिकातर्फे इमारत वापरण्याकरीता ऑक्युपेशन सर्टिफिकेट आवश्यक असलेल प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून विजपुरवठा आणि महानगरपालिका किंवा महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाकडून पाणी पुरवठा यापासून वंचित राहील.

तरी कृपया मंजूर इमारत नकाशाप्रमाणे आपण बांधकाम करुन महानगरपालिकेला सहकार्य करावे.

कार्यालयाचा शिक्का :

अमरावती महानगरपालिका AMC अमरावती

इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार याच्या संदर्भात कामगार विभागानी निर्गमीत केलेले नियम/परिपत्रक/प्रचलीत आदेश यांची जमीन मालक/विकासक यांनी पुर्तता करणे बंधनकारक राहील,असे न झाल्यास संबधीत जमीन मालक/विकासक यांचे विरुदध योग्य ती कार्यवाही नियोजन प्राधिकरणाकडुन करण्यात येईल.

Valid for Proposed Construction Only

- Valid up to Plinth Level only -

आदेश क्रमांक :

दिनांक :

सहपत्रः १) मंजूर योजनेच्या प्रति
२) सूचना फलकावर नमूद करावयाच्या माहितीचे पत्रक

सहाय्यक संचालक नगर रचना
महानगरपालिका, अमरावती

Scanned with CamScanner

# अमरावती महानगरपालिका

नाहरकत प्रमाणपत्र क्रमांक : **0223**

दिनांक : **28 November, 2019**

प्रती,

श्री / श्रीमती **SAU. VIPUL URF SADHANA UTTAM JADHAO**

**AMT.**

विषय : विज पुरवठा मिळणे बाबत नाहरकत प्रमाणपत्र.

संदर्भ : आपला अर्ज क्रमांक : **0052** दिनांक : **28 June, 2019** .

अमरावती महानगरपालिका AMC अमरावती

महोदय,

| | | | |
|---|---|---|---|
| आपणास भुखंड क्रमांक | : **2** | सर्वे क्रमांक | : **187/1,187/2** |
| मौजा | : **RahatGaon** | सोसायटी | : ________ |
| प्रभाग | : ________ | रस्ता | : **AMRAVATI** |

असलेल्या विद्यमान / नविन बांधकाम झालेल्या ईमारतीत फक्त तात्पुरते / कायम स्वरूपाचे **निवासी** वापर करीताच विज घेणे करीता महानगरपालिकेचे हरकत नसलेले हे प्रमाणपत्र खालिल अटीवर देण्यात येत आहे.

1) वीज पुरवठ्याच्या वापर उपयोग मुख्यतरूऔद्योगिकध्उद्योग विषयक अंतर्गत व्यवसायाकरिता मुळीच करता येणार नाही.

2) **निवासी** वापरा व्यतिरीक्त इतर वापराकरीता उपयोगात येणार विज पुरवठा अवैध समजण्यात येवुन अर्जदारावर कायदेशिर कारवही करण्यात येईल.

3) विज पुरवठा प्रमाणपत्र

अ) अवैध विज वापरा बददल.

ब) अर्जदाराने चुकीच्या दिलेल्या माहीती बद्दल रद्द करण्याचा अधिकार महापालीकेने राखुन ठेवला आहे.

4) आपले घर/झोपडी पुढे मागे काढुन टाकण्यात आल्यास आपणास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा हक्क राहणार नाही.

5) नाहरकत प्रमाणपत्र आधारे शासकीय तथा खाजगी जागेवर कोणत्याही हक्क दावा करता येणार नाही.

6) घराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर इमारत परवाना म.न.पा. तुन प्राप्त केल्यानंतरच कायम स्वरूपीचे विज कनेक्शन करिता नाहरकत प्रमाणपत्र कार्यालयाकडुन प्राप्त करावे लागेल.

सहाय्यक संचालक, नगररचना,

महानगरपालिका, अमरावती.





Scanned with CamScanner